# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक ११९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४१११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail :-desk4a@dtemaharashtra.gov.in Web :- http//www.dtemaharstra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : ४/आस्था/२०१८/ ७१०

दिनांक : 19 DEC 2018

विषय : शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांबाबत

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२५-०५-२००६

सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि. २५-०५-२००६ अन्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ४ ( ४ ) नुसार शासकीय कर्मचा-यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्याची तरतूद आहे.

संचालनालयाच्या असे निर्दशनास आले आहे की, संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थेतील अध्यापक व इतर आस्थापनांवरील अधिकारी / कर्मचारी हे त्यांच्या बदल्यांच्या कामाकरीता विभागाच्या मा.सचिवांना ते कार्यरत असलेल्या संस्थाप्रमुखांची कोणतीही पूर्व परवानगी न घेता थेट भेटत असतात. तसेच विभागाचे मा. उपसचिव व संचालक यांच्याकडे सुध्दा बदलीचे कामासाठी पाठपुरावा करतात. त्याचप्रमाणे संबंधीत अध्यापक दूरध्वनी/ भ्रमणध्वनी/ Whatsupव्दारे संदेश पाठवून संबंधितांचा नाहक वेळ घेत असतात. याबाबत मा.सचिवांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून सदर बाबीची तंत्र शिक्षण संचालनालयाकडून गांभीर्याने नोंद घेतली आहे.

त्यामुळे संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांतील अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांच्या नियतकालिक बदल्यांबाबत संबंधित आस्थापनांकडून, नियतकालिक बदल्यांचे परिपत्रक निर्गमित केल्यानंतर त्यानुसारच विहित मार्गाने बदल्यांबाबतचे अर्ज / निवेदन/ विनंती सादर करावेत. तसेच ज्या कामाकरीता त्यांना वरिष्ठांची भेट घ्यावयाची आहे त्याकरीता संबंधीत कार्यालय प्रमुखांची पूर्व परवानगी घेऊनच सर्व संबंधीत वरिष्ठांना भेटावे.

सदर परिपत्रकाचे उल्लंघन केल्यास संबंधित अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपिल ) नियम १९७९ मधील नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरतील व त्यानुसार संबंधितांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक,तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय मुंबई यांना सविनय सादर

२) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय मुंबई यांना सविनय सादर

३) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

४) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

५) सर्व प्राचार्य, पदवी , पदविका व तत्सम संस्था.

अनु. क्र. ३, ४ व ५ यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निर्दशनास आणावे.

६) कार्यासन क्र. ३, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/बदल्या/२०१८/ 5393
दिनांक 27 DEC 2018

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील / कार्यालयातील अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांना या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांच्या नियतकालिक बदल्यांसंदर्भात संबंधित आस्थापनांकडून नियतकालिक बदल्यांचे परिपत्रक निर्गमित केल्यानंतर त्यानुसारच विहीत मार्गाने बदल्यांबाबतचे अर्ज / निवेदने / विनंती सादर करावेत, तसेच त्या कामाकरिता त्यांना वरिष्ठांची भेट घ्यावयाची आहे, त्या करिता संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांची पूर्व परवानगी घेऊनच सर्व संबंधित वरिष्ठांना भेटावे. तसेच सदर पत्राचे उल्लंघन केल्यास संबंधित अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरतील व त्यानुसार संबंधितांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.